**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## लेखिका इस्मत चुगताई यांचे साहित्यातून महिला सक्षमीकरण - डॉ. प्रभा गणोरकर
## विद्यापीठात हिंदी पंधरवाडा निमित्त व्याख्यान संपन्न

अमरावती -

स्त्रीयांच्या कोमल भावना, तिचे सक्षमीकरण, सबलीकरण, उंच भरारी घेण्याची तिची धडपड, स्त्री जीवनाचे वास्तविक चित्रण सुप्रसिद्ध लेखिका इस्मत चुगताई यांच्या साहित्यातून दर्शित होत असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यीक तथा कवयित्री डॉ. प्रभा गणोरकर यांनी केले. 'नारीवादी दृष्टीकोनसे इस्मत चुगताई इनका साहित्य' या विषयावर विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात व्याख्यान देतांना त्या बोलत होत्या.

विद्यापीठाचा हिंदी विभाग आणि स्त्री अभ्यास केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने हिंदी पंधरवाडा निमित्त विशेष व्याख्यान आणि नारीवादी हिंदी कविताओं का पाठ्यांकाचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्रभारी हिंदी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. वैशाली गुडधे उपस्थित होत्या.

डॉ. गणोरकर विषयाच्या अनुषंगाने मांडणी करतांना म्हणाल्या, लेखिका इस्मत चुगताई समर्थशाली, प्रभावशाली होत्या. सर्वांनी वाचावे असे त्यांचे साहित्य आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीयांना मिळणारा दुय्यम दर्जा, वागणूक, त्यांचेवरील अत्याचार, अन्याय आदींची विदारक मांडणी त्यांच्या साहित्यात आहे. त्यांना यासाठी त्याकाळी न्यायालयीन कारवाईचा सामना सुद्धा करावा लागला.

त्यांच्या कथा सुद्धा सहजपणे समजत नाहीत, त्यांच्या कथा बारकाईने अभ्यासाव्या लागतात. स्त्री विषयक अनेक पैलू त्यांच्या कथांमध्ये वाचायला मिळतात. स्त्रीयांच्या यातना, वेदना, अवस्था, वास्तविकता यातून दिसून येते. स्त्री केंद्रीत कथाकार असा इस्मत चुगताई यांचा नावलौकिक असून सर्वांनी त्यांचे साहित्य वाचावे, असे आवाहन डॉ. गणोरकर यांनी यावेळी केले.

अध्यक्षीय भाषणांत कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, केंद्र शासनाने हिंदी पंधरवाडा साजरा करण्यासाठी दिलेल्या निदेशानुसार विद्यापीठाच्या हिंदी विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमाच्या माध्यमातून हिंदी साहित्याचे अध्ययन होईल, अशी आशा व्यक्त करुन पुढे म्हणाले, मातृभाषा-बोलभाषा हे आपले वैभव आहे. भाषा संस्कृतीसोबत जोडली असून हिंदी भाषेला स्वातंत्र्यानंतर राजभाषेचा दर्जा दिला गेला. अनेक साहित्यकारांनी आपली साहित्यकृती देशात निर्माण केली आहे. ती एक ताकद असून सर्वांनी त्या साहित्याचे वाचन व अध्ययन करण्याची खरी गरज आहे. कवितांचे उत्कृष्टपणे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केल्याबद्दल कुलगुरुंनी त्यांचे कौतुक केले.

'नारीवादी हिंदी कविताओंका पाठ्यांक' अनुषंगाने दिपाली शेगावकर, स्वाती बोने, पुजा अलोणे, प्रतीक्षा धंदर, भाग्यश्री कांबळे, गजानन बेसरकर, सहजाद शेख व प्रिया गजभिये या विद्यार्थ्यांनी आपल्या कवितांचे उत्कृष्टरितीने सादरीकरण करुन सर्वांची मने जिंकून घेतली.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात होवून माता सरस्वती, संत गाडगे बाबा व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पुस्तक देवून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. मोना चिमोटे यांनी केले. यावेळी डॉ. वैशाली गुडधे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सौ. रेखा धुराटे यांनी सरस्वतीस्तवन सादर केले. संचालन डॉ. सुनिता बुंदेले यांनी, तर आभार डॉ. चंदन विश्वकर्मा यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचा हिंदी विभाग, स्त्री अभ्यास केंद्र, आणि विद्याभारती महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच मराठी विभागप्रमुख डॉ. मनोज तायडे, डॉ. हेमंत खडके, डॉ. माधव फुटवाड, डॉ. प्रणव कोलते, डॉ. भगवान फाळके, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २४/०९/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी